Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- XII | ISSUE- XI | NOVEMBER | 2025 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.379 | ISSN 2349-638x

# भारतीय सार्वजनिक उपक्रतातील रोजगारावर 1991 आर्थिक धोरणाचा झालेल्या परिणामाचे विश्लेषण

**डॉ. बाळासाहेब निर्मळ**

देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

मुलतः सार्वजनिक उपक्रमांची निर्मिती करण्यामागे सरकारची भूमिका अधिक स्पष्ट होती. या उपक्रमांनी देशाच्या औद्योगिक विकासात महत्वपूर्ण योगदान देवुन भांडवलाची निर्मिती, आयातीला पर्याय शोधणे, संशोधनास चालना देणे, सरकारकडील आर्थिक मदत कमी करुन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे, रोजगार निर्मिती करुन समाजवादी समाजरचनेस हातभार लावणे इत्यादी उद्देश साध्य करण्यासाठी सार्वजनिक उपक्रमांना राजाश्रय देवून या उद्योगांचा देशात झपाट्याने विकास करण्यांचा प्रयत्न झाला. या सार्वजनिक उपक्रमांनी देशातील औद्योगिक विकास, पायाभूत क्षेत्राचा विकास, रोजगारांच्या संधी आणि प्रादेशिक असमतोल दुर करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. परंतु या क्षेत्रामध्ये निर्माण झालेले दोष आणि समस्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याने या समस्या वाढत गेल्या. यामध्ये अतिरिक्त नोकरभरती, भ्रष्टाचार, राजकीय हस्तक्षेप, कालबाह्य तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक शिस्तीच्या अभावाबरोबरच कार्यसंस्कृती व प्रेरणेचा अभाव या सारख्या समस्यांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने हे उपक्रम 90 च्या दशकात भारतीय अर्थव्यवस्थेवर बोझा बनले होते.

सार्वजनिक उपक्रम हे सरकारच्या आर्थिक धोरणांच्या अंमलबजावणीचे आणि रोजगार निर्मितीचे साधन आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात झपाट्याने औद्योगिक विकास आणि रोजगारांच्या विविध संधी निर्माण करण्यासाठी सरकारने सार्वजनिक उपक्रमांना केंद्रस्थानी ठेवुन मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणुक केली. या उपक्रमामधून अनेक प्रकारचा रोजगार उपलब्ध करण्यात भारत सरकार यशस्वी झाले आहे. मुलतः सार्वजनिक उपक्रम हे कौशल्याअधारित स्वरुपाचे असल्याने या उपक्रमांच्या माध्यमातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराची निर्मिती झाली आहे. देशामध्ये सार्वजनिक उपक्रमांचा झपाट्याने विस्तार होत असला तरी देशातील एकूण रोजगार निर्मितीमध्ये सार्वजनिक उपक्रमांचा वाटा घटत आहे. यांची माहिती तक्ता क्रं. 4.1. देण्यात आली आहे.

**तक्ता क्रं. 4.1 सार्वजनिक उपक्रमातील कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या** (संख्या लाखामध्ये)




1951 नंतर देशात सार्वजनिक उपक्रमांच्या संख्यात्मक वाढीबरोबर त्या उपक्रमांतील रोजगार देखील वाढला आहे. 1964 मध्ये कार्यरत सार्वजनिक उपक्रमांत 4 लाख कर्मचारी कार्यरत होते त्यामध्ये वाढ होवून 1979 मध्ये 17 लाख आणि 1991 मध्ये 21.79 लाख कर्मचारी कार्यरत होते. म्हणजेच 1991 पर्यंत सार्वजनिक उपक्रमातील रोजगाराची संख्या सतत वाढताना दिसते. 1991-92 या वित्तीय वर्षानंतर भारत सरकारने सार्वजनिक उपक्रामातील अतिरिक्त मनुष्यबळ कमी करण्यासाठी विनानौकरशाहीकरन, अर्धवार्षिक, स्वैच्छासेवानिवृत्ती धोरणाचा स्वीकार, अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर आणि तोट्यातील व आजारी उपक्रम बंद करणे किंवा त्यांचे इतर उपक्रमामध्ये विलन करण्याची प्रक्रिया सुरु केल्याने सार्वजनिक उपक्रमातील रोजगाराची संख्या मोठ्या प्रमाणात घटत आहे.

2011-12 मध्ये 1446202 कर्मचारी कार्यरत होते. त्यामध्ये घट होवून 2013-14 मध्ये एकूण कार्यरत 234

केंद्रीय उपक्रमामध्ये 1349493 कर्मचारी होते. 2011-12 आणि 2013-14 मधील एकूण कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्याचा विचार करता 2014 मध्ये 96709 लोकांनी आपला रोजगार गमवावा लागला आहे. 2006-07 च्या तुलनेत 2013-14 मध्ये रोजगारात 16.29% घट झाली आहे. ही अत्यंत चिंतेची बाब मानली जाते. कारण यातील बहुतेक कर्मचारी हे कंत्राट आणि रोजनदारी स्वरुपाचे काम करत असून यांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण आणि कौशल्य अवगत नाही त्यामूळे त्यांच्यासमोर दैनंदिन गरजा आणि ऊदरनिर्वाह चा प्रश्न निर्माण झाला आहे.

**सार्वजनिक उपक्रमातील रोजगारामध्ये महिलांचा सहभाग:-**

सार्वजनिक उपक्रमांची निर्मितीमधील प्रमूख उद्देशामध्ये देशात रोजगारांच्या विविध संधी निर्माण करणे आणि समाजातील सर्व स्तरातील घटकांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देवून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यास सार्वजनिक उपक्रमांनी प्रमूख भूमिका आणि योगदान द्यावे अशी भूमिका सरकारची होती. त्यामध्ये सार्वजनिक उपक्रम मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले आहेत परंतु सार्वजनिक उपक्रमातील महिलांचा सहभाग आणि कार्यरत महिलांची संख्या अगदी नगण्य स्वरुपाची होती. 1980 मध्ये एकूण कार्यरत कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचा वाटा फक्त 4% होता. परंतु 1993 नंतर भारत सरकारने सर्वच क्षेत्रात महिलांना रोजगारांच्या संधी निर्माण करण्यावर अधिक प्राधान्य दिले जात असून कामाच्या ठिकाणी महिलांना सर्व भौतिक सुविधा आणि कामांच्या ठिकाणी महिलांची होणारी पिळवणूक, महिलांवर होणारे अत्याचार आणि लैगिक शोषण रोखण्यासाठी विविध कायद्यांची निर्मिती केली असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी देखील केली जात आहे. 2013 च्या कंपनी कायद्यानूसार कंपण्याच्या संचालक मडळामध्ये महिला सदस्यांची नेमणूक बंधनकारक केली आहे. त्यामूळे सार्वजनिक उपक्रमात महिलांचा विविध स्तरावर सहभाग वाढत आहे. याची माहिती तक्ता क्रं. 4.2. मध्ये दिली आहे.

**तक्ता क्रं. 4.2 सार्वजनिक उपक्रमातील रोजगारामध्ये महिलांचा सहभाग**

| Group | Total No. Of Employees | | | Total Female Employees | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 |
| Managerial | 273331 | 275283 | 270539 | 25943 | 26462 | 26547 |
| Supervisors | 141674 | 139733 | 130345 | 9872 | 10136 | 12864 |
| Workers | 1031197 | 983514 | 948609 | 96314 | 92702 | 93517 |
| Total | 1446202 | 1398530 | 1349493 | 132129 | 129300 | 132928 |

तक्ता क्रं. 4.29. चे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, 2011-12 मध्ये सार्वजनिक उपक्रमात एकूण 1446202 विविध श्रेणीतील कर्मचारी कार्यरत होते. महिलांची संख्या 132129 होती. यामध्ये व्यवस्थापक श्रेणीतील महिला कर्मचाऱ्यांची संख्या एकूण कार्यरत संख्येच्या 9.49% तर पर्यवेक्षक श्रेणीतील 6.97% कामगार श्रेणीतील महिला कर्मचाऱ्यांची संख्या 9.34% होती. यामध्ये 2013-14 मध्ये सार्वजनिक उपक्रमातील कार्यरत कर्मचाऱ्याची संख्येत घट होवून 1349493 झाली.

परंतु महिला कर्मचाऱ्यांच्या संख्येमध्ये वाढ होवून ती संख्या 132928 होती. म्हणजेच 2011-12 मधील एकूण कार्यरत कर्मचाऱ्यामध्ये महिलांचा वाटा 9.14% वरुन 2013-14 मध्ये 9.84% इतका आहे म्हणजेच यामध्ये 0.67% वाढ झाली आहे. याचे श्रेणीनिहाय विश्लेषण केले असता व्यवस्थापकीय श्रेणीत 0.32% पर्यवेक्षण श्रेणीत 2.9% तर कामगार श्रेणीत 0.52% वाढ झाली आहे. यावरुन असे दिसून येते की 1991 नंतर सार्वजनिक उपक्रमातील एकूण कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्येत घट होत असताना एकूण कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्येत महिलाचा सहभाग वाढत असून हे प्रमाण सेवा क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या उपक्रमांत अधिक आसल्याचे दिसून येते. उपक्रम निहाय सार्वजनिक उपक्रमांतील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्यांचा विचार करता 2004-05 पासुन भारत दुरसंचार निगम लिमिटेडमध्ये सर्वाधिक कर्मचारी कार्यरत असून 2013-14 मध्ये देखील तो अव्वल स्थान कायम आहे. 2004-05 मध्ये या उपक्रमात 339853 कर्मचारी कार्यरत होते तर 2013-14 मध्ये 238277 कर्मचारी कार्यरत आहेत म्हणजेच 101576 लोकांचा रोजगार कमी झाला आहे.

परंतु सार्वजनिक उपक्रमामधील कार्यरत कर्मचाऱ्यांवरील वेतन आणि मजुरीवरील खर्चाच्या प्रमाणात सतत वाढ होत आहे. 2006-07 मध्ये एकूण सार्वजनिक

उपक्रमात 16.14 लाख कर्मचारी कार्यरत होते. त्यांच्या वेतन आणि मजुरीवरील एकूण खर्च 52586 करोड रुपये होता. त्यामध्ये वाढ होवून 2013-14 एकूण 13.51 लाख कर्मचाऱ्यांवर 121038 कोटी रु. खर्च झाला आहे. म्हणजेच या खर्चात 2006-07 च्या तुलनेत 130% वाढ झाली आहे. तसेच एकूण कार्यरत कर्मऱ्यामागे सार्वजनिक उपक्रमांची उपलब्धीमध्ये देखील वाढ झाली आहे. 2006-07 मध्ये प्रति व्यक्ती उपलब्धी 325869 रु. होती. ती 2013-14 मध्ये 888305 रु. इतकी वाढली आहे. म्हणजेच 2005-06 च्या तुलनेत ही वाढ 172% आहे.

यावरुन असे दिसून येते की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात रोजगाराची निर्मिती करण्यात सार्वजनिक उपक्रमांनी महत्वाची भूमिका बजावली असली तरी 1991 मध्ये हेच सार्वजनिक उद्योग त्यांच्याकडील अतिरिक्त श्रमशक्तीमूळे ओळखले जावु लागले. त्यामूळे सरकारने या उपक्रमामध्ये विनानोकरशाही करणाची प्रक्रिया राबविण्यात येत असून सार्वजनिक उपक्रमातील रोजगारात घट होत असली तरी सार्वजनिक उपक्रमांचा कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन आणि मजुरीवरील खर्चात वाढ 2006-07 च्या तुलनेत 130% वाढ झाली आहे. या वाढीमधील 30% निधी हा व्यवस्थापकीय क्षेणीच्या कर्मचाऱ्यांवर होत आहे. त्याबरोबरच प्रति व्यक्तीच्या उपलब्धीमध्ये देखील 172% वाढ झाली आहे. भारतीय सार्वजनिक उपक्रमामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या जमेची बाजु म्हणजे 2009 पासुन अमेरिकेमध्ये निर्माण झालेली जागतिक मंदी दृष्य परिस्थितीमुळे जगभरातील विविध आंतरराष्ट्रीय उद्योग समुहांनी उत्पादन प्रक्रिया थांबल्याने या उद्योग समुहानी मोठ्या प्रमाणात विनानोकरशाही करणाची प्रक्रिया राबविल्याने मोठ्याप्रमाणात लोकांना बेरोजबार होण्याची वेळ आली असून या पार्श्यभुमिवर भारतीय सार्वजनिक उपक्रमांनी कार्यरत कामगार आणि कर्मचारी वर्गाचे हितसंबध जोपासण्याचा प्रयत्न केला आहे.

**विनानोकरशाहीकरण धोरणाचा सार्वजनिक उपक्रमातील रोजगारावर झालेला परिणामः**

1948 नतर देशात सार्वजनिक उपक्रमांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली. 90 च्या दशकात भारतीय सार्वजनिक उपकम हे आर्थिक संकटात सापडले होते, त्यांच्या विविध कारणांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की सार्वजनिक क्षेत्राचा वैवध्यपूर्ण आवाका असल्याने सर्वच क्षेत्रातील उपक्रमाबाबत एकच धोरण चुकीचे त्तत्व होते. याच तत्वाचा 90 पर्यंत स्वीकार करण्यात आला. तसेच 1992-93 मधील भारतीय अर्थव्यवस्थेच्या सहामाही आढव्यात या लोकोद्योगासंबधी असे म्हटले होते की, 'सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योग त्यांच्याकडील अतिरिक्त श्रमशक्तीमूळे परिचित आहेत आणि नफा या निकषाच्या आधारे त्यांचे मुल्यमापन केल्यास अनेक वर्षे ते सातत्याने धोक्यात आहेत. यासाठी विविध क्षेत्रामध्ये या श्रमशक्तीची फेररचना करता येईल असे निर्वेशन धोरण राबविण्यांच्या आवश्यकतेवर अधिक भर दिला होता.

1992 मध्ये जागतिक बँकने भारतीय सार्वजनिक उपक्रमासंबधिच्या अहवालात सार्वजनिक उद्योगांच्या सुधारणेचा एक धाडसी कार्यक्रम राबविण्यांची भारत सरकारला सुचना करुन त्यामध्ये या उद्योगामधील अतिरिक्त श्रमशक्तीसाठी निर्वेशन धोरण राबविण्याची महत्त्वपूर्ण अट भारताला अर्थसाह्य देण्याच्या पुर्वी टाकण्यात आली होती. ही अट भारत सरकारने मान्य केली होती. याबरोबरच भारत सरकारने आद्योगिक आजारपणा संदर्भात नेमेलेल्या गोस्वामी समितीने देखील आतिरीक्त मनुष्यबळ कमी करण्यासाठी विनानौकरशाहीकरण धोरणाचा स्वीकार करण्यांची शिफारस केली होती. भारत सरकारने या शिफारशीचा स्वीकार करत 1993 पासुन या सार्वजनिक उपक्रमातील अतिरिक्त मनुष्यबळ कमी करण्यास सुरुवात केली आहे. आजपर्यंत जवळपास 24 क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या उपक्रमामध्ये किती कर्मचाऱ्यांना अतिरिक्त घोषीत केले व त्यांना सरकारने कार्यमुक्त केले आहे. त्यांचे विवरण तक्ता क्रं. 4.30 दिले आहे .

तक्ता क्रं. 4.30

**विनानौकरशाही करणाचा सार्वजनिक उपक्रमातील रोजगारावरील परिणाम**

| COGNATE GROUP | Managerial/ Executives | Supervisory | | Non executives | | Casual/daily/Rated worker | Contract/worker | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | uniorisd | Nonunionised | skilled | unskilled | | | |
| Agro Based | 323 | 285 | 202 | 1482 | 1425 | 638 | 309 | 4664 |
| Coal | 18590 | 35820 | 265 | 159787 | 139771 | 1530 | 3010 | 358773 |
| Crude oil | 26487 | 5621 | 27 | 8234 | 3000 | 616 | 18897 | 62882 |
| Minerals & metals | 5275 | 1129 | 660 | 15892 | 11170 | 2532 | 9999 | 46657 |
| Steel | 21039 | 6410 | 1083 | 83936 | 9788 | 1441 | 99443 | 223140 |
| Petroleum | 26621 | 6713 | 3726 | 21221 | 8300 | 72 | 54117 | 120770 |
| Fertilizers | 4557 | 1136 | 1087 | 5266 | 1092 | 414 | 9809 | 23361 |
| Chemicals & pharmaceuticals | 1415 | 55 | 514 | 2968 | 790 | 167 | 1014 | 6923 |
| Heavy engineering | 14973 | 8642 | 1651 | 27898 | 1151 | 51 | 18062 | 72428 |
| medium light eng. | 15191 | 559 | 4211 | 18620 | 16734 | 16615 | 3845 | 75775 |
| Transportation equipment | 18854 | 6342 | 680 | 37581 | 1820 | 7340 | 19702 | 92319 |
| Consumer good | 1889 | 1172 | 880 | 11604 | 5798 | 1550 | 6070 | 28963 |
| Textiles | 791 | 628 | 368 | 7217 | 1147 | 3531 | 4070 | 17752 |
| Power generation | 27110 | 451 | 4141 | 33816 | 5052 | 285 | 14740 | 85595 |
| Power transmission | 3843 | 0 | 2348 | 2664 | 176 | 0 | 479 | 9510 |
| Trading& marketing | 3317 | 7949 | 16587 | 8599 | 55774 | 440 | 365 | 93031 |
| Transport services | 15902 | 8858 | 175 | 14661 | 12283 | 806 | 17529 | 70214 |
| Contract &construction | 3771 | 2398 | 1348 | 5949 | 1394 | 953 | 711 | 16524 |
| Industrial development &tech. consultancy | 7024 | 1301 | 2642 | 2369 | 868 | 98 | 3737 | 18039 |
| Tourist services | 825 | 229 | 806 | 2320 | 1078 | 662 | 356 | 6276 |
| Financial services | 1709 | 402 | 270 | 467 | 397 | 58 | 60 | 3363 |
| Telecommunication | 55831 | 0 | 10 | 225901 | 10442 | 3367 | 0 | 295551 |
| Enterprises under Construction | 1093 | 25 | 134 | 155 | 30 | 0 | 26 | 1463 |
| **Grand total** | **276430** | **96125** | **43815** | **698607** | **289480** | **43166** | **286350** | **1733973** |

तक्ता क्रं. 4.30. चे विश्लेषण केले असता असे दिसून येते की सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे 5 श्रेणी मध्ये वर्गीकरण केले जाते. 1991 पासुन वित्तीय वर्ष 2013-14 पर्यंत विनानौकरशाही करणाच्या माध्यमातून या पाच श्रेणीतील एकूण 1690741 कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त केले आहे. त्याचे श्रेणी निहाय विश्लेषण केले असता व्यवस्थापक श्रेणीतील *16.08%* पर्यवेक्षक श्रेणी *7.72%* त्यामध्ये संघटीत *77.74%* त्यामध्ये अंसंघटीत *22.25%* तर पर्यवेक्षण श्रेणीचे प्रमाण *56%* त्यामध्ये प्रशिक्षीत *70.96%* आणि अप्रशिक्षीत *29.03%* तसेच दैनदिन रोजगार पध्दती *1.81%*,रोजंदारी *18.25%* इतके होते.

विनौकरशाहीच्या प्रक्रियामुळे कार्यमुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचे कार्यरत क्षेत्रनिहाय विश्लेषण केल्यास असे दिसून येते की , कोळसा क्षेत्रामध्ये सर्वाधिक 352342 व्यक्तीना कार्यमुक्त केले असून एकूण सार्वजनिक क्षेत्रातील कार्यमुक्त केलेल्या व्यक्तीच्या 20% कार्यमुक्ती कोळसा क्षेत्रात देण्यात आली आहे. सर्वात कमी कार्यमुक्ती वित्तीय क्षेत्रात 3460 व्यक्तीना देण्यात आली असून त्याचे एकूण कार्यमुक्तीशी प्रमाण 0.20% आहे. इतर क्षेत्रामध्ये कृषी

0.17%, कच्चेतेल 3.81%, खनिज व धातू 3.29%,लोखंड 13.68%, पेट्रोलियम 7.24%, फर्टीलाइझर 1.21%, रसायन आणि औषधनिर्माण 0.42% ,अवजड उद्योग 3.38%, मध्यम व हलकी अभियांत्रिकी 3.48%, वाहतूक कच्चा माल/ क्रूड 0.05%, ग्राहक सेवा 0.01%, टेक्सटाईल 0.96%, विद्युत निर्मिती 5.22%, विद्युत वितरण 0.53%, वाणिज्य आणि व्यापार 5.08%, वाहतूक सेवा 4.29%, indistrial dovieplopment & consultancy 0.01%, पर्यटन सेवा 0.33%, वित्तीय सेवा 0.002%, दुरसंचार सेवा 16.49% आणि निर्माण क्षेत्राचा वाटा 0.35% होता. यावरुन असे दिसून येते की विनानौकरशाही करणामूळे क्षेत्रनिहाय सर्वाधिक कार्यमुक्ती कोळसा, लोखंड, पेट्रोलियम, दुरसंचार सेवा मध्ये केली असून हे क्षेत्र अतिरिक्त मनुष्यबळाने 1990 अगोदरच परिचीत होते.

सर्वाधिक कार्यमुक्त करण्यात येणाऱ्या सार्वजनिक उपक्रमांचे उपक्रम निहाय विश्लेषण केल्यास कोळसा क्षेत्रात कार्यमुक्त व्यक्तीची संख्या 352342 होती. त्यामध्ये साउथ वेस्टर्न कोलफिंल्डस लिमिटेड (70910), भारत कुकिंग कोल लि. (58960), वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड (52485) व्यक्तीना कार्यमुक्त केले आहे. तर स्टील क्षेत्राचा विचार करता यामध्ये 231352 व्यक्तीना कार्यमुक्त केले असून यामध्ये स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया (193743), राष्ट्रीय इस्पात निगम लि. (34029) व्यक्तीना कार्यमुक्त केले. पेट्रोलियम क्षेत्रामध्ये एकूण 122497 व्यक्तीना कार्यमुक्त केले असून सर्वाधिक कार्यमुक्ती हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (34297), इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. (33929) व्यक्तीना कार्यमुक्त केले.

अवजड उद्योंग क्षेत्रामध्ये 57155 व्यक्तीना कार्यमुक्त केले असून भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमीटेड मध्ये सर्वाधिक 47525 व्यक्तीना कार्यमुक्त केले असून हेवी इंजिअरिंग कॉर्पोरेशन लि. (4039) कार्यमुक्त केले. मध्यम आणि हलकी अभियांत्रिकी क्षेत्रामध्ये एकूण 58898 व्यक्तीना कार्यमुक्त केले असून या क्षेत्रात सर्वाधिक प्रमाण Andrew Yule & company ltd. (15097),Bharat pumps & compressors ltd (14508) आणि आयटीआय लिमीटेड मध्ये (7350) व्यक्तीना कार्यमुक्त केले आहे.

टेक्सटाइल क्षेत्रात नॅशनल टेक्सटाइल कॉर्पोरेशन लि. मध्ये 14431 व्यक्तीना कार्यमुक्त केले आहे. तर विद्युत निर्मितीमध्ये 88361 व्यक्तीना कार्यमुक्त केले असून सर्वाधिक प्रमाण नव्हेली लिग्ननाईट कॉर्पोरेशन लि. (31543), एनटीपीसी लिमीटेड (23411), एनएचपीसी लिमीटेड (12856), न्यूक्लीयर पावर कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमीटेड (11772) व्यक्तीना कार्यमुक्त केले आहे. वाणिज्य आणि व्यापार क्षेत्रामध्ये फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया मध्ये (74021) आणि वाहतूक क्षेत्रामध्ये एअर इंडिया लिमीटेड. (25047) तर एअरपोर्ट ऑथारिटी ऑफ इंडिया (34477) व्यक्तीना कार्यमूक्त केले आहे. तर दुरसंचार क्षेत्रामध्ये 278965 व्यक्तीना कार्यमुक्त केले असून सर्वाधिक कार्यमुक्ती भारत संचार निगम मध्ये (241625) तर महानगर टिलीफोन निगम लिमीटेड (36541) व्यक्तीना कार्यमुक्त केले आहे.

यावरुन असे दिसून येते की, केंद्रीय सार्वजनिक उपक्रमामध्ये विनानौकरशाही करणाची प्रक्रिया राबविली जात असल्याने 2014 पर्यंत एकूण 1690741 व्यक्तीना कार्यमुक्त केले असून याचा सर्वाधिक फटका प्रशिक्षीत, अप्रशिक्षीत कामगार, रोजंदारी कामगार व कंत्राटदारमार्फत कार्यरत कामगार यांना झाला असून या सर्वाचा मिळुन एकूण 1288249 व्यक्तीना 2014 पर्यत कार्यमुक्त केले आहे. यांचे एकूण कार्यमूक्त केलेल्या व्यक्तीच्या 76.19% वाटा आहे. परंतु सरकारने या क्षेणीतील कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी कोणतीही योजना किंवा या कामगारांचे इतर क्षेत्रातील उपक्रमामध्ये समायोजन केले नाही. कारण या सर्व व्यक्तीचा रोजगार हा कायमस्वरुपी नव्हता. परंतु सरकारने व्यवस्थापकीय आणि पर्यवेक्षण श्रेणीतील व्यक्तीना कार्यमुक्त करताना स्वेच्छासेवा निवृत्ती आणि VVR च्या माध्यमातून या क्षेणीतील कर्मचाऱ्यांचे हितसंबध जोपासुन त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. परंतु इतर कर्मचाऱ्याकडे दुर्लक्ष केले आहे.

सार्वजनिक उपक्रमांमधुन कार्यमुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढण्यामागे प्रमुख कारण म्हणजे यामधील बहुतांश कर्मचारी हे आजारी उपक्रम म्हणून घोषीत केलेले उपक्रमात कार्यरत होते. तसेच या उपक्रमांचा सततचा तोटा यामुळे सरकारने हे उपक्रम बंद करण्यासंबधी घेतलेला निर्णय आणि काही उपक्रमांचे सरकारने केलेल्या खाजगीकरणामूळे ही संख्या अधिक वाढत आहे. या बरोबरच नफ्यात आणि कार्यक्षेत्र अधिक असणाऱ्या उपक्रमामध्ये देखील विनानौकरशाहीकरणाची प्रक्रिया राबवली जात आहे. कारण या उपक्रमांनी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि

आधुनिक यंत्रसामुग्रीचा वापरामूळे कमीतकमी मानवी संसाधनाचा वापर आज केला जात असल्याने अगोदर कार्यरत पण आता अतिरिक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त घोषीत करण्याशिवाय याच्याकडे पर्याय नव्हता कारण यांच्या वेतन आणि मजुरीचा भार सार्वजनिक उपक्रमांना अधिकचा होता. त्यामूळे कार्यमुक्त व्यक्तीच्या संख्येत वाढ झाली आहे. परंतु सार्वजनिक उपक्रमामधील कार्यरत कर्मचाऱ्यांवरील वेतन आणि मजुरीवरील खर्चाच्या प्रमाणात सतत वाढ होत आहे. 2013-14 एकूण 13.51 लाख कर्मचाऱ्यांवर 121038 कोटी रु. खर्च झाला आहे. म्हणजेच आज सार्वजनिक उपक्रमामध्ये कार्यरत कामागारांची संख्यात्मक वाढ महत्वाची नसुन या उपक्रमामध्ये प्रशिक्षित, कार्यकुशल आणि व्यावसायिक नैतिकतेच्या तत्वाच्या अधिन राहुन कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अधिक भर दिला जात आहे.

**निष्कर्ष:**

1951 ते 1990 पर्यंत भारतीय विकासाच्या प्रारुपामध्ये मिश्र अर्थव्यवस्था आणि नियोजनाचा स्वीकार करुन सार्वजनिक उपक्रमांना महत्वाचे स्थान देवून औद्योगिक विकास, सामाजिक न्याय, समाजवादी समाजरचना आणि देशात सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणण्यांचे साधन मानले. त्यामूळे देशात सार्वजनिक उपक्रमांचा झपाट्याने विकास झाला, परंतु हेच सार्वजनिक उपक्रम 1990 च्या दशकात भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रमूख भार बनले होते. या उपक्रमातील प्रमूख समस्या आणि आव्हाने सोडविण्यासाठी 1991 च्या औद्योगिक धोरणामध्ये सार्वजनिक क्षेत्रामध्ये बदल करताना सरकारला सार्वजनिक उपक्रमाबाबत काही बाबतीत कठोर निर्णय घ्यावे लागले होते. परंतु सरकारला कामगार संघटना, विरोधीपक्ष आणि समाजवादी विचारसरणीचे अभ्यासक, पुरस्कर्ते आणि राजकीय नेतृत्वाकडून विरोध करण्यात आला होता. त्यांची अशी धारणा बनली होती की, सरकारच सार्वजनिक उपक्रमामध्ये खाजगीकरणाच्या माध्यमातून आपली भूमिका संकूचित करुन त्यामधील सरकारी पैसा काढून घेवुन हे क्षेत्र खाजगी उद्योगपती आणि व्यावसायिकांना विकण्यांचा डाव आहे. असे मत निर्माण झाले होते सर्वसामान्य जनतेच्या मनात संभ्रमावस्था निर्माण झाली होती. परंतु हे सर्व बदल सार्वजनिक उपक्रमांनी स्विकार करत त्यांची प्रभावी अंमलबजावणी केल्यांमूळे हे उपक्रम सर्व स्तरावरील आपली भूमिका पार पाडत आहेत. देशामध्ये रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करुन देण्यामध्ये सार्वजनिक उपक्रमांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. 1951 नंतर देशात सार्वजनिक उपक्रमांच्या संख्यात्मक वाढीबरोबर त्या उपक्रमांतील रोजगार देखील वाढला आहे. 1964 मध्ये कार्यरत सार्वजनिक उपक्रमांत 4 लाख कर्मचारी कार्यरत होते त्यामध्ये वाढ होवून 1979 मध्ये 17 लाख आणि 1991 मध्ये 21.79 लाख कर्मचारी कार्यरत होते. तर 2013-14 मध्ये एकूण कार्यरत 234 केंद्रीय उपक्रमामध्ये 1349493 कर्मचारी कार्यरत होते. यावरुन असे दिसून येते की, देशामध्ये रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे.

1991-92 या वित्तीय वर्षानंतर भारत सरकारने सार्वजनिक उपक्रामातील अतिरिक्त मनुष्यबळ कमी करण्यासाठी विनानौकरशाहीकरण, अर्धवार्षिक, स्वेच्छासेवानिवृत्ती, अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर व तोट्यात आणि आजारी उपक्रम बंद करणे किंवा त्यांचे इतर उपक्रमामध्ये समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरु केल्याने सार्वजनिक उपक्रमातील रोजगाराची संख्या मोठ्या प्रमाणात घटत आहे. 2011-12 मध्ये 1446202 कर्मचारी कार्यरत असून 2013-14 मध्ये एकूण कार्यरत 234 केंद्रीय उपक्रमामध्ये 1349493 कर्मचारी कार्यरत होते. 2011-12 आणि 2013-14 मधील एकूण कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्याचा विचार करता 2014 मध्ये 96709 लोकांचा रोजगार कमी झाला आहे. परंतु यामध्ये व्यवस्थापक क्षेणीतील रोजगारात कोणतीही कपात झाली नसुन पर्यवेक्षन क्षेणीमधील 11329 लोकांचा रोजगार कमी झाला आहे. कामगारक्षेणीतील रोजगाराचा विचार करता 2011-12 च्या तुलनेत 2013-14 मध्ये 82588 लोकांचा रोजगार कमी झाला आहे एकंदरित 2006-07 च्या तुलनेत 2013-14 मध्ये -16.29% घट झाली आहे. ही अत्यंत चिंतेची बाब मानली जाते.

भारत सरकारने ऑक्टोबर 1988 पासून स्वेच्छिकसेवा निवृत्ती योजनेची अंमलबजावणी सुरु केली असुन मार्च 2014 पर्यंत या योजनेंतर्गत 6.17 लाख कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले. त्यामूळे अतिरीक्त कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करताना संबधीत कर्मचाऱ्याचे देखील आर्थिक हितसंबध जोपासण्यात भारत सरकारला या योजनेच्या माध्यमातून यश आले आहे.

1991 नंतर सार्वजनिक उपक्रमांत कार्यरत मनुष्यबळाची फेररचना करताना उपक्रमांत अतिरीक्त कर्मचारी कपात धोरण राबविण्यात आले. यासाठी स्वैच्छिक सेवा निवृत्तीचे प्रारूप आणले. यामुळे अनेक श्रमिक व कामगारांना आपला रोजगार गमवावा लागला. सरकारने या समस्यांकडे मानवीय दृष्टीकोनातून पाहून त्या कामगारांना आपल्या कार्यात सुधारणा आणि संगठीत क्षेत्रात रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या हेतूने सरकारने 2001-02 पासुन सार्वजनिक उपक्रम विभागार्तंगत सी. आर. आर. योजना सुरु केली. स्वैच्छिक सेवा निवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांना परामर्श, पुनःप्रशिक्षण आणि पुर्नियोजन करणे हा या योजनेचा हेतू आहे. या योजने अंर्तगत 2001-02 पासुन 2014 पर्यंत एकूण 27 कर्मचारी साहय्यता केंद्र आणि 8 नोडल एजन्सी मार्फत 183124 लोकांनी फायदा घेतला आहे.

1991 नंतर सार्वजनिक उपक्रमातील रोजगारमध्ये घट होत असली तरी कार्यरत कर्मचाऱ्यांमध्ये महिला कर्मचाऱ्यात वाढ होत आहे. 2011-12 मधील एकूण कार्यरत कर्मचाऱ्यामध्ये महिलांचा वाटा 9.14% वरुन 2013-14 मध्ये 9.84% इतका आहे म्हणजेच यामध्ये 0.67% वाढ झाली आहे. याचे श्रेणी निहाय विश्लेषण केले असता व्यवस्थापकीय श्रेणीत 0.32% पर्यवेक्षण श्रेणीत 2.9% तर कामगार श्रेणीत 0.52% वाढ झाली आहे. यावरुन असे दिसून येते की 1991 नंतर सार्वजनिक उपक्रमातील एकूण कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्येत घट होत असताना एकूण कार्यरत कर्मचाऱ्यांच्या संख्येत महिलाचा सहभाग वाढत असून हे प्रमाण सेवा क्षेत्रात कार्यरत असलेल्या उपक्रमांत अधिक दिसून येते.

**संदर्भ ग्रंथः**

1) पाटील ज. फा., ताम्हणकर पी. जे.(1980),विकास व नियोजनाचे अर्थशास्त्र,कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर पुणे,
2) कटारिया सुरेन्द्र (2007),आर्थिक नीती एवं प्रशासन, मलिक एण्ड कम्पनी जयपूर,.
3) देसाई स. श्री. मु., भालेराव निर्मल (1998) भारतातील औद्योगिक अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे.
4) Choudhary C.M. (2004), Dynamics Of Indian Economy, Sublime Publication, Japur,
5) Public Enterprises Survey – 2013 -14.
6) शर्मा टी.आर., वाष्र्णेय जे.सी., सिंहल मोहन (2007), विकास का अर्थशास्त्र एंव नियोजन, साहित्य भवन पब्लिकेशन आगरा.
7) Mathur, B.L. Mathur Reeta (2010) 'Accountability And Autonomy Relationship In Central Public Sector Enterprises In India Through Memorandum Of Understanding', International Conference On Applied Economic-Icoae
8) Http://Dpe.Nic.In/Sites/Upload_Files/Dpe/Files/Pesurvey_13_14/Val1/Chapter_8.Pdf
Mathur B. P. (1999), Public Enterprises Management, Macmillan Business Book.,
9) Singh Bishwa Nath (1991), Public Enterprise In Theory And Practice, Deep & Deep Publications, New Delhi,
10) Http://Dpe.Nic.In/Sites/Upload_Files/Dpe/Files/Pesurvey_13_14/Val1/Chapter_6_Organisational_Structure_And_Hrm